# चळवळीतली बाळं आणि चळवळीचं बाळकडू



**चेतन साळवे** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण

मी आधी ठरवलं होतं की, आपण लग्नच करायचं नाही. कारण मला तेव्हा सुरुवातीला फक्त १५००रुपये मानधन मिळायचं. एवढ्याशा अल्प मानधनावर संसार कसा चालवायचा हा प्रश्न होता. आमच्या बाजूला रिचर्ड अंकल राहायचे, एकटेच. ते आधी विनोबांच्या भूदान चळवळीत कार्यकर्ता म्हणून काम करायचे या भागात. त्यांचं एका मुलीवर प्रेम होतं. परंतु ती वेगळ्या जातीची असल्यामुळे त्यांचा विवाह झाला नाही आणि त्यांनी अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला. कालांतराने चळवळ बंद झाली, चळवळीतले सोबती कुठे कुठे स्थायिक झाले. रिचर्ड अंकल मात्र धडगावलाच राहिले. त्यांना मेकॅनिकचं काम येत असल्याने त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालू झाला. मिळालेल्या पैशाने जेवण व २४ तास दारूच्या नशेत अंकल जीवन जगत होते. एके दिवशी ते आजारी पडले. मी त्यांना गोळ्या आणून दिल्या व त्यांचे हात-पाय दाबून देत होतो. त्यांचा स्वत:चा परिवार राहिला असता तर ते आज म्हातारपणी असे एकटे पडले नसते. तेव्हा विचार आला की, कालांतराने नर्मदा आंदोलनही बंद होईल, आपल्या सोबत असलेले कार्यकर्ते त्यांच्या डिग्रीमुळे कुठेतरी कामाला लागतील. आपलं काय? कारण माझी डिग्री ही पूर्ण झाली नव्हती. मग मी निश्चय केला लग्न करण्याचा.

लग्न करायचं तर एकतर ती नोकरीवाली असावी किंवा तिची लग्नानंतर नोकरी करण्याची तयारी असली पाहिजे. तरच संसार करणं शक्य होतं. माझ्या थोरल्या बहिणीने एक मुलगी सुचवली. ती नगरपालिकेत नोकरीला देखील आहे. माझ्यापेक्षा एक वर्षाने मोठी होती. मी म्हटलं, ठीक आहे. दरवेळी मुलगाच कशाला वयाने मोठा असला पाहिजे? मी पोरगी पाहिली. मी तिला पसंत पडलो. ती मला पसंत पडली. परंतु तिच्या आई-वडिलांना कोणीतरी मनात भरवलं की, 'तुमची मुलगी तर पगार कमावते व तो मुलगा काखेत झोला घेऊन गावोगाव हिंडतो. त्याला कशाला देताय?' मग त्या मुलीच्या आई-बाबांकडून नकार मिळाला.

दुसरी मुलगी शहाद्याच्या बहिणीनेच पाहिली. मला सांगितलं, 'मुलगी आणि तेथील माणसं चांगली आहेत.' मग आरतीबरोबर विवाह करण्याचा निर्णय घेतला. आमचा साखरपुडा झाला व एका महिन्याच्या आत लग्न करण्याचा निर्णयही. त्याच वेळी इकडे दिल्लीला मोर्चा काढायचं देखील ठरलं. मी निघालो मोर्च्याला. आम्हाला वाटलं होतं की, दिल्लीहून तीन-चार दिवसांत परत येऊ. दादर-अमृतसर या गाडीने आम्ही दिल्लीला निघालो. चारपाचशे लोक होते सोबत महाराष्ट्राचे. त्यांना निझामुद्दीन रेल्वेस्टेशनवर उतरवत असताना एक म्हातारा उतरायचा बाकी होता. तेवढ्यात गाडी सुरू झाली. मग मी घाईत त्या म्हाताऱ्यासकट चालत्या गाडीतून उडी टाकली. या धांदलीत माझी कागदपत्रांची एक बॅग आणि माझी फोन डायरी आतच राहिली. (त्या वेळी माझ्याकडे मोबाइल नव्हता.) मेधाताईंना ही गोष्ट सांगितली. ताईंनी मला सिमप्रीत सिंगला फोन करायला सांगितलं. त्याने कुरुक्षेत्राला राहणाऱ्या त्याच्या मित्राला फोन केला. त्या मित्राने मी सांगितलेल्या डब्यातून माझी कागदांची बॅग स्टेशन मास्टरकडे जमा केली. इकडे आंदोलन जास्तच वाढत चाललं होतं. शासन ऐकायला तयार नसल्यामुळे मेधाताईसह चार जणांनी अनिश्चितकालीन उपोषण करण्याचा निर्णय घेतला. २१ दिवस उपोषण चाललं, त्या काळात चार वेळा आम्हाला पोलिसांनी उचलून नेलं. परत जागेवर येऊन जंतरमंतरला धरणं सुरू. इकडे घरच्यांना आणि मुलीकडल्यांना वाटायचं की, हा का लग्न करायचं नाही म्हणून फरार झाला. कारण माझ्याकडे फोन नाही व घरचे व सासुरवाडीचे लँडलाईन नंबर फोन डायरीत होते आणि फोन डायरी कुरुक्षेत्रला राहिली होती. ३२ दिवस आंदोलन चाललं दिल्लीत, आमच्या मागण्या मान्य झाल्यानंतर आम्ही परतलो. घरी आल्यानंतर लगेच मला पकडून माझं लग्न लावून देण्यात आलं.





लग्नानंतर आरतीने नर्सिंगचा कोर्स करायचा निर्णय घेतला. कोर्स केल्यानंतर तिला धडगावलाच एनआयएचएमअंतर्गत कंत्राटी आरोग्य सेविका म्हणून नोकरी लागली. ३० सप्टेंबर २०१०ला आम्हाला पहिला मुलगा झाला, त्याचं नाव आम्ही 'संघर्ष' ठेवलं. आरती अगदी दीड महिन्यापासून संघर्षला बसमध्ये रोज सोबत घेऊन जायची. थोडा मोठा झाल्यावर मग मी सोबत घेऊन जायचो, कधी आमच्या ऑफिसला, कधी तहसील कार्यालयात, कधी बीडीओत, तर कधी पोलीस स्टेशनला तो कायम सोबतच असायचा.जेव्हा जुन्या धडगावच्या जि.प. शाळेत पहिलीत नाव टाकलं आणि पहिल्या दिवशी आरती त्याला घ्यायला गेली तेव्हा शाळेतून बाहेर आलेला संघर्ष आईला म्हणाला, ''चल मम्मी, आमची मिटिंग संपली.'' आता संघर्ष पाचवीला आहे. परंतु दुसरा मुलगा 'सम्यक' हा आता चार वर्षांचा आहे. त्यालाही कधी आरती सोबत घेऊन जाते, तर कधी मी. कोणतेही सरकारी कार्यालय असो वा मोर्चा – सम्यक सोबत असतो.

अशाच एका मोर्चावेळी सम्यक सोबत होता, घोषणाबाजी जोरात सुरू होती, पोलीस भरपूर होते. एसपीसाहेब आले. ते म्हणाले, ''तुम्ही मोर्चाची परवानगी घेतली नाही, त्यामुळे तुम्हां सर्वांना अटक करून जेलमध्ये पाठवावं लागेल.'' मलाही सम्यक कडेवर असताना पोलीस-गाडीत बसवण्यात आलं. आम्हाला ५७ जणांना अटक करण्यात आली आणि आधी पोलीस-ठाण्यात आणण्यात आलं. पोलिसांनी आम्हाला जेलमध्ये पाठवण्याचा निर्णयच घेतला होता. दोन दिवसांनंतर आदिवासींचा प्रमुख सण असतो होळी.परंतु तरीही आम्हाला जेलमध्येच पाठवण्याचा निर्णय पोलिसांनी घेतलाच होता. रात्र होत चालली. सम्यक सोबतच होता. त्याला भूकही लागली होती. आरती धडगावला. तिला फोन करून सांगितलं की, आम्हाला अटक झाली व उद्या जेलमध्ये टाकतील. आता या गोष्टी तिला नवीन नव्हत्या, कारण याआधीही मी आंदोलनात दोन वेळा धुळे जेलमध्ये होतो. ती म्हणाली, ''सम्यकच कसं करणार?'' माझ्याही पुढे हा प्रश्न होता. मग मी माझ्या मोठ्या बहिणीला फोन केला, व तिला पोलीस स्टेशनमध्ये येऊन सम्यकला घेऊन जाण्यास सांगितलं. सुदैवाने ती आली, नाहीतर सम्यकला इतक्या लहानपणीच बालसुधारगृहात पाठवलं गेलं असतं.

चळवळीत असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मुलांना लहानपणापासूनच चळवळीचं बाळकडू मिळालेलं असतं, ते असं.

*narmada.chetan@gmail.com/9307579904*